**(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ : नागपूर**

**(न्या. जे. एन. पटेल आणि न्या. एस. टी. खर्चे ह्यांच्या न्यायपीठासमक्ष)**

शीला एस. येरपुडे

विरुद्ध

गृह विभाग, मुंबई आणि इतर

**फौजदारी रिट याचिका क्र. ३२८/२००२**

**२७ जानेवारी २००५ रोजी निर्णय**

-----------------------------------------------------------------------------------

**न्यायालयाचा न्यायनिर्णय** द्वारा न्या. जे. एन. पटेल:

पोलीस आयुक्त नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या लकडगंज आणि गिट्टीखदान या पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकार्यांनी, गैर बंदिवासात ठेवणे, बंदिवासात असताना छळ करणे आणि पोलिसांच्या कोठडीत असताना झालेला मृत्यु ह्या कारणांवरून उत्तरवादी राज्य आणि त्याच्या अधिकाऱ्यांविरुद्ध, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद क्रमांक २२६ आणि २२७

अंतर्गत, १० लाख रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी करणारी याचिका सुधाकर येरपुडे यांच्या विधवा श्रीमती शीला यांनी दाखल केली आहे.

२. गंगाधर येरपुडे यांचा मुलगा सुधाकर हा सोनार होता आणि नागपूरच्या चितार ओली येथील नागोबा लेन येथे सोन्याचे दागिने खरेदी, विक्री आणि निर्मितीचा व्यवसाय करीत होता. याचिकाकर्ती ही सुधाकर यांची पत्नी आहे. सुधाकर ह्यांच्यापासून त्यांना तीन अपत्य म्हणजेच दोन मुले आणि एक मुलगी आहे. ही मुले अल्पवयीन आहेत आणि याचिकाकर्ती आणि तिची मुले त्यांच्या उदरनिर्वाहासाठी आणि भविष्यासाठी मृतक सुधाकर यांच्या उत्पन्नावर पूर्णपणे अवलंबून होती. याचिकाकर्तीचा असा दावा आहे की ९.२.२००२ रोजी मृतक सुधाकर याला नागपूर येथील लकडगंज पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी त्याच्या घरातून ताब्यात घेतले आणि त्याला अटक न दाखवता आणि अटक झाल्यानंतर २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यासमोर हजर न करता, तीन दिवस गैर बंदिवासात ठेवले. याचिकाकर्तीला आणि तिच्या नातेवाईकांना त्याच्या अटकेची आणि बंदिवासाची कारणे कळवण्यात आली नाही आणि याचिकाकर्तीने या प्रकरणात अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तरीही तीन दिवस पूर्ण झाल्यानंतरच लकडगंज पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी, लाच म्हणून १३० ग्रॅम सोने, १०० ग्रॅम चांदी आणि रुपये १५,०००/- जमा केल्यावर मृतक सुधाकर याला सोडून देण्यास सहमती दर्शवली. याचिकाकर्तीची तक्रार आहे की, तिचे पती बेकायदेशीरपणे बंदिवासात असताना, लकडगंज पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा शारीरिक छळ केला आणि त्यांच्या सुटकेसाठी वर उल्लेखित सोने,

चांदी आणि १५,०००/- रुपयांची रक्कम देण्यासाठी त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक दबाव आणला. अश्या असहाय परिस्थिती मध्ये, याचिकाकर्ती आणि तिचे पती ह्यांच्याकडे लकडगंज पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर मागण्या पूर्ण करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता आणि म्हणूनच त्यांनी १३० ग्रॅम सोने, १०० ग्रॅम चांदी आणि १५,०००/- रुपयांची रक्कम दिली. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, पोलीस अधिकाऱ्यांचा असा दावा होता की मृतक सुधाकर ह्यांनी ते १३० ग्रॅम सोने आणि १०० ग्रॅम चांदी, एका अश्या व्यक्ती कडून विकत घेतले होते ज्या व्यक्तीने ते कुठूनतरी चोरून आणले होते आणि प्रकरण मिटवण्यासाठी आणि तिच्या पतीची, त्यांच्या बेकायदेशीर बंदिवासातून सुटका करण्यासाठी १५,०००/- रुपयांच्या रकमेची मागणी केली होती. त्यांची मागणी पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी ११.०२.२००२ रोजी त्यांची सुटका केली. याचिकाकर्तीचा असा दावा आहे की, तिच्या पतीने -मृतक सुधाकर यांनी पोलिसांना सांगितले होते की, त्याचे या व्यवहाराशी काही देणे घेणे नाही, तो पूर्णपणे निर्दोष आहे आणि त्या व्यक्तीशी किंवा दागिन्यांशी त्याचा कोणताही प्रकारे संबंध नाही, तरीही पोलीस अधिकाऱ्यांनी त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरूच ठेवला, ज्यातून त्याची सुटका सोने, चांदी आणि रोख रक्कम दिल्यावरच झाली. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, तिला इतका मोठा धक्का बसला की संबंधित पोलिस अधिकाऱ्यांविरोधात कोणतीही कारवाई करणे तर दूरच, ती कुठलीही प्रतिक्रिया सुद्धा देऊ शकली नाही.

३.  त्यानंतर २७/०२/२००२, रोजी रात्री ११.०० ते ११.३० दरम्यान जेव्हा मृतक सुधाकर आपल्या कुटुंबासमवेत त्याच्या घरात झोपलेला असताना, साध्या कपड्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी त्याच्या घरी येऊन त्यांना झोपेतून उठवले. पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतःची ओळख, पोलीस सब इन्स्पेक्टर राठोड आणि पोलीस कॉन्स्टेबल तिवारी, पोलीस स्टेशन गिट्टीखदान, अशी करून दिली. त्यांनी मृतक सुधाकरला त्याच्याच घरात मारहाण करण्यास सुरुवात केली. यावर याचिकाकर्तीच्या अल्पवयीन मुलीने तिच्या वडिलांना पकडले, परंतु पोलिसांनी तिला दूर ढकलले. जेव्हा याचिकाकर्तीने हस्तक्षेप केला आणि ते तिच्या पतीला का मारहाण करत आहेत असे विचारले, तेव्हा त्यांनी तिला सांगितले की ते सुधाकर ह्यांना आपल्या ताब्यात घेत आहेत आणि जर याचिकाकर्तीला तिच्या पतीला ताब्यात न घेता किंवा या प्रकरणाची पुढे कार्यवाही न करता ताबोडतोब सोडविण्याची इच्छा असेल तर याचिकाकर्तीने त्यांना ५०,०००/- रुपयांची रक्कम त्वरित द्यावी.

४.  याचिकाकर्तीचे असे म्हणणे आहे की, तिच्याजवळ पुरेसे पैसे नसल्याने आणि पतीला केलेली मारहाण बघितल्याने ती व्यथित मनःस्थितीत असल्याने तिने तिच्या नातेवाईकांना फोन करण्याची परवानगी मागितली, परंतु, पोलिसांनी तिला फोन करण्याची परवानगी दिली नाही आणि सुधाकरला घरातून त्यांच्या गाडीत ओढून नेले आणि तिथून ते त्याला घेऊन गेले. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, तिने पोलिस कर्मचाऱ्यांना विनंती सुद्धा केली की तिचा पती हृदयविकाराचा रुग्ण आहे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याला नियमित औषधे घ्यावी लागतात, परंतु पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही आणि तिला सांगितले की ती क्षुल्लक

कारणे देत आहे आणि जर त्याला वैद्यकीय मदतीची गरज असेल तर त्यांना अशा परिस्थितींचा सामना कसा करायचा हे माहित आहे.

५. याचिकाकर्तीने असेही म्हटले आहे की या घटनेमुळे शेजारी जमा झाले, त्यांनी गाडी थांबवीण्याचा प्रयत्न केला आणि पोलिस अधिकाऱ्यांना विचारले की सुधाकरला अमानुषपणे का वागविले जात आहे आणि त्याला पोलीस स्टेशनला का नेण्यात येत आहे, परंतु पोलिस अधिकाऱ्यांनी प्रश्नांची उत्तरे न देता त्याला त्यांचे सोबत गिट्टीखदान पोलिस स्टेशनला नेले.

६. याचिकाकर्तीचे असे म्हणणे आहे की, ती तिच्या नातेवाईक आणि मित्रांसह गिट्टीखदान पोलिस स्टेशनला गेली आणि त्याच्या अटकेबाबत संबंधित पोलिस स्टेशन येथे चौकशी केली आणि ज्या तक्रारीच्या आधारे त्याला ताब्यात घेण्यात आले होते त्याची प्रत मिळण्यासाठी आग्रह धरला, परंतु पोलिस अधिकाऱ्यांनी प्रथम खबरी अहवालची प्रत, ज्याच्या आधारे त्याला बंदिस्त ठेवण्यात आले होते, देण्यास नकार तर दिलाच परंतु नातेवाईक आणि मित्रांनी वारंवार विनंती करूनही त्याला सोडण्यासही नकार दिला. म्हणून मृतक सुधाकर यांचे नातेवाईक आणि मित्र मध्यरात्रीनंतर सुमारे दीड वाजता गिट्टीखदान पोलिस स्टेशन इथून निघून गेले.

७ . याचिकाकर्तीचे म्हणणे आहे की, रात्री ३ वाजताच्या सुमारास तिला गिट्टीखदान पोलीस स्टेशन इथून धमकीचा फोन आला आणि त्यांनी तिच्या पतीच्या लहान भावाच्या ठावठिकाणाबाबत चौकशी केली, तिने ठावठिकाणा माहीत नसल्याची माहिती दिली.

त्यानंतर, याचिकाकर्तीला गिट्टीखदान पोलिस स्टेशन इथून कोणताही फोन आला नाही. पतीच्या आरोग्याच्या काळजीपोटी तिला रात्रभर झोप आली नाही आणि तिने भयभीत अवस्थेत रात्र घालवली. त्यानंतर, थेट सकाळी ६ वाजता गिट्टीखदान पोलिस स्टेशनहून तिला फोन आला की सुधाकर यांचे निधन झाले आहे आणि त्यांचा मृतदेह मेयो रुग्णालयात ठेवण्यात आला आहे आणि शवविच्छेदनानंतर ती त्यांचा मृतदेह रुग्णालयातून घेऊन जाऊ शकते. याचिकाकर्तीला धक्का बसला आणि तिने आपल्या नातेवाईकांना आणि मित्रांना ह्याबाबत कळविले. जेव्हा याचिकाकर्ती तिच्या नातेवाईक आणि मित्रांसोबत मेयो रुग्णालयात पोहोचली तेव्हा तेथे एकही पोलिस अधिकारी नव्हता आणि तिच्या पतीचा मृतदेह कुठे ठेवला आहे याबद्दल तिला कोणतीही माहिती मिळू शकली नाही, म्हणून, याचिकाकर्ती तिच्या नातेवाईकांसह सकाळी ११ वाजताच्या दरम्यान गिट्टीखदान पोलिस स्टेशन येथे पोहोचली आणि तिथे चौकशी केली. मात्र २७ आणि २८ फेब्रुवारी २००२ च्या दरम्यान च्या रात्री काय घडले याबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती दिली नाही. विविध स्तरातून वारंवार चौकशी केल्यानंतर याचिकाकर्तीला हे प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (गुन्हे) ह्यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती मिळाली आणि पोलीस स्टेशन अधिकाऱ्यांनी याचिकाकर्तीला 'तपास सुरू आहे' अशी केवळ मोघम उत्तरे दिली. या परिस्थितीत, याचिकाकर्तीने लेखी तक्रार दाखल केली आणि एफआयआरची प्रत मागितली आणि तिच्या पतीच्या मृत्युच्या प्रकरणात काय कार्यवाही करण्यात आली आहे, याची माहिती मागितली आणि सांगितले की पोलीस सब इन्स्पेक्टर राठोड आणि पोलीस कॉन्स्टेबल तिवारी आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी २७ फेब्रुवारी २००२ रोजी, रात्री, तिच्या पतीला मारहाण

केली आणि जबरदस्तीने आणि बेकायदेशीरपणे तिच्या पतीला गिट्टीखदान पोलिस स्टेशन येथे नेले. तिने असेही मत व्यक्त केले की उपर्युक्त पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलिस कोठडीत असतानाच्या अमानवीय शारीरिक छळा मुळेच तिच्या पतीचा मृत्यु झाला आहे अशी तिला खात्री आहे आणि त्यांनी तिच्या पतीचा खून केला आहे. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने(गुन्हे) या प्रकरणाचा तपास हाती घेतल्यामुळे आपण या तक्रारीकडे लक्ष देऊ शकणार नाही, अशी माहिती गिट्टीखदान पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी आणि संबंधित पोलीस उपायुक्त जे त्यावेळी गिट्टीखदान पोलीस स्टेशन येथे हजर होते, ह्यांनी याचिकाकर्तीला दिली.

८. याचिकाकर्तीचे असे म्हणणे आहे की, गिट्टीखदान पोलीस स्टेशनच्या ताब्यात असताना पोलिसांनी केलेल्या तिच्या पतीची क्रूर हत्या लपविण्याचा आणि झाकून टाकण्याचा पोलीस विभागाकडून प्रयत्न करण्यात आला होता. त्यामुळे याचिकाकर्तीने या न्यायालयात फौजदारी रिट याचिका क्र. ११४/२००२ दाखल केली आणि २७ ते २८ फेब्रुवारी २००२ च्या दरम्यान च्या रात्री गिट्टीखदान पोलिस स्टेशनच्या ताब्यात असलेल्या तिच्या पतीची म्हणजे - सुधाकर गंगाधर येरपुडे यांच्या मृत्यूची (हत्या) निष्पक्ष, तपशीलवार आणि सखोल चौकशी करण्याचे निर्देश न्यायालयाने द्यावेत अशी याचना केली. याचिकाकर्तीने तिच्या पतीच्या मृत्यूसाठी जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने अटक करण्याची मागणी देखील केली आहे. तिच्या पतीला लकडगंज पोलीस स्टेशनमध्ये तीन दिवस बेकायदेशीरपणे बंदिस्त ठेवल्याबद्दल चौकशी करावी आणि लकडगंज पोलीस स्टेशनमध्ये ९ फेब्रुवारी २००२ ते ११ फेब्रुवारी २००२ या कालावधीत बेकायदेशीरपणे बंदिस्त

ठेवल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शिक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. याचिकाकर्तीने, आपली तक्रार स्वीकारण्यास नकार देणाऱ्या आणि प्रथम खबरी अहवालची प्रत देण्यास नकार देणाऱ्या आणि तिच्या पतीच्या मृत्यूबाबत कोणतीही माहिती देण्यास नकार देणाऱ्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे. तिच्या पतीचा कोठडीत मृत्यु झाल्याने उत्तरवादींनी १० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे कोर्टाने निर्देश द्यावे, अशी मागणीही तिने केली आहे.

९. उत्तरवादींनी या याचिकेला विरोध करत असे म्हंटले आहे लकडगंज पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांबद्दल याचिकाकर्तीच्या तक्रारीनुसार ९.२.२००२ ते ११.२.२००२ या कालावधीत याचिकाकर्तीच्या पतीला बेकायदेशीररित्या बंदिस्त ठेवणे आणि बंदिस्त असताना छळ करण्यासाठी ते जबाबदार नाहीत. त्यांचे असे म्हणणे आहे की लकडगंज पोलीस स्टेशनच्या गुन्हा क्र. ६७/२००२ भारतीय दंड विधानाच्या कलम ३९९ आणि शस्त्र कायद्याच्या कलम ४ आणि २५ च्या अंतर्गत काही संशयितांना अटक करण्यात आली होती आणि चौकशीदरम्यान, आरोपींपैकी एक रुपेश माकोडे याने कबूल केले की त्यांनी नागपूरच्या अनंतनगर येथील डॉ. प्रदीप मारपकवार यांच्या घरात तसेच सावनेर येथे डकैती केली होती आणि डॉ. मारपकवार यांच्या घरातून चोरलेली मालमत्ता सुधाकर येरपुडे यांना विकली गेली आहे आणि तपासादरम्यान, याचिकाकर्तीचा पती १२. २. २००२ रोजी सुमारे १०. ४५ वाजता स्वतःहून पोलिस स्टेशनला आला आणि डकैतीच्या गुन्ह्यातील मालमत्ता म्हणजेच १०० ग्रॅम सोन्याची पट्टी, २४ ग्रॅम सोन्याची पट्टी आणि १०० ग्रॅम चांदीची पट्टी सादर केली.

त्याच्याकडून ही मालमत्ता जप्त करण्यात आली होती आणि त्याला पोलीस स्टेशनमध्ये कधीही बंदिस्त ठेवण्यात आले नव्हते. तसेच त्यांनी १५,०००/- रुपयांची रक्कम घेतल्याचे सुद्धा नाकबूल केले आहे. याचिकाकर्त्याच्या, पोलिसांच्या कोठडीत असतानाच्या मृत्युच्या आरोपाचा जो संबंध आहे, त्यात वादच नाही की याचिकाकर्तीचा पती गिट्टीखदान पोलिस स्टेशनच्या ताब्यात होता. हे सादर केले जाते की सुधाकर येरपुडे यांना छातीत वेदना होत असल्याने रुग्णालयात दाखल करणे आवश्यक होते आणि त्यांना मेयो रुग्णालयात नेण्यात आले, जिथे सुधाकर यांच्या तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले आणि त्यानंतर लगेच २८ फेब्रुवारी २००२ रोजी ४. ५५ वाजता, सुधाकर येरपुडे यांच्या घरी त्यांच्या मृत्यूची माहिती देण्यासाठी पोलीस कॉन्स्टेबल शत्रुघ्न यांना तातडीने पाठवण्यात आले. तसेच ह्याची माहिती राज्य गुन्हे अन्वेषण विभाग(गुन्हे) नागपूर ह्यांच्या कडे पाठविण्यात आली आहे आणि ए.डी. प्रथमतः त्याच दिवशी सकाळी ४.४० वाजता नोंदविण्यात आली आणि ह्या बाबतीत आवश्यक ती पावले उचलण्यात आली. हे सादर केले जाते की राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (गुन्हे) पोलीस सब इंस्पेक्टर स.द. राठोड आणि हेड कॉन्स्टेबल राममूर्ती तिवारी यांच्याविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२, ३४२ आणि ३३० अन्वये गुन्हा क्रमांक ७६/२००२ दाखल केला असून तपास सुरू आहे. ह्या प्रकरणामध्ये पोलिस विभागाने प्राथमिक चौकशीनंतर या दोन पोलिस अधिकाऱ्यांसह चौघांना २.३.२००२ रोजी निलंबित केले आहे. राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर येथील पोलीस निरीक्षक लक्ष्मण तिघारे यांनी, तपास अधिकारी या नात्याने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरील उत्तर, ज्यामध्ये नमूद केले आहे की, सुधाकर गंगाधर येरपुडे यांच्या मृत्युप्रकरणी, पोलीस सब इन्स्पेक्टर राठोड, पोलिस

हेड कॉन्स्टेबल राममूर्ती तिवारी आणि पोलीस कॉन्स्टेबल राजेश मिश्रा यांच्या विरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ३३०, ३४२ आणि ३०२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा क्र. ७६/२००२ दाखल असून तपास सुरू आहे आणि तपासात समाधानकारक प्रगती आहे आणि तपास योग्य वेळी पूर्ण केली जाईल, विचारात घेता, या न्यायालयाने दिनांक ३.४.२००२ च्या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे नमूद करून उपर्युक्त याचिका निकाली काढली:

"श्री. देवपुजारी, सहायक सरकारी वकील यांनी निवेदन केले की हे प्रकरण आधीच गुन्हे अन्वेषण विभागा कडे सोपविण्यात आले आहे आणि तपास सुरू आहे. श्री देवपुजारी, सहायक सरकारी वकील, ह्यांच्या मते, फक्त रासायनिक विश्लेषकाचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही आणि त्यानंतर तत्काळ योग्य ती पावले उचलली जातील.

श्री देवपुजारी, सहायक सरकारी वकील ह्यांचे असे म्हणणे आहे की विभागाद्वारे सर्व पावले लवकरात लवकर उचलली जातील.

हे लक्षात घेता आम्हाला या याचिकेत काहीही तथ्य आढळले नाही आणि याचिकाकर्त्याच्या तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे असे म्हणता येईल. या पार्श्वभूमीवर याचिका निकाली काढण्यात आली आहे.”

१०. बहुधा, आरोपपत्र दाखल झाल्यानंतर, याचिकाकर्तीने १० लाख रुपयांच्या नुकसानभरपाईचा दावा करण्याच्या हेतूने ही याचिका दाखल करून पुन्हा या न्यायालयाकडे धाव घेतली आहे. ही याचना याचिकाकर्तीने ह्यापूर्वी दाखल केलेल्या याचिकेत न्यायालयाने विचारात घेतली नव्हती.

११. सध्याच्या याचिकेत याचिकाकर्तीने असा दावा केला आहे की, तिचा पती दरमहा ७,५००/- रुपये कमवीत होता आणि पोलिस कोठडीत असताना, पोलिसांच्या हातून त्याचा अकाली मृत्यू झाला तेव्हा तो ४० वर्षांचा होता. त्यामुळे त्यांचे वार्षिक उत्पन्न ९०,०००/- रुपये इतके होते. हे सादर केले जाते की मृतकाचे आयुर्मान निश्चितपणे सामान्य स्थितीत ६० वर्षांपेक्षा कमी नसेल. त्यामुळे याचिकाकर्त्याला आणखी २० वर्षे जगता आले असते. म्हणूनच, उर्वरित आयुर्मानाशी गुणाकार केल्यास, उत्पन्न १८ लाख रुपये होते. या १८ लाख रुपयांच्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम मृतकाच्या वैयक्तिक खर्चापोटी वजा केल्यास त्याने त्याच्या कुटुंबीयांना जी रक्कम दिली असती ती १३,५०,०००/- रुपये होईल. त्यामुळे १३,५०,०००/- रुपये नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार असल्याचा दावा याचिकाकर्ती ने केला आहे. याचिकाकर्तीने असा युक्तिवाद केला आहे की, तिला याचिका प्रलंबित असताना अंतरिम भरपाई म्हणून राज्याकडून २ लाख रुपये मिळाले आहेत आणि त्यामुळे तिला उर्वरित ११, ५०, ०००/- रुपये भरपाई देण्यात यायला हवी.

१२. याचिकाकर्तीच्या दाव्याला उत्तर देताना, उत्तरवादी क्रमांक २ च्या वतीने नागपूरच्या पोलिस आयुक्तांनी प्राधिकृत केलेले नागपूरच्या गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त, मधुकर नारायणराव जाधव यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. इतर प्रतिवादींनी कोणतेही उत्तर न देण्याचा निर्णय घेतला. उत्तरवादी क्रमांक २ चे म्हणणे आहे की गिट्टीखदान पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी गुन्हा क्रमांक २७२/२००१ मध्ये कथित सुधाकर याला ताब्यात

घेतले आणि चौकशी दरम्यान त्याने छातीत वेदना होत असल्याची तक्रार केली आणि त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तपासाअंती त्याला मृत घोषित केले. सुधाकर गंगाधर येरपुडे यांच्या पोलीस कोठडीत झालेल्या मृत्युचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाने केला होता आणि पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या मारहाणीमुळे सुधाकर यांचा मृत्यू झाल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाले होते. त्यामुळे गुन्हे अन्वेषण विभागाने या पोलीस अधिकाऱ्यांविरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ आणि ३३० सह कलम ३४ अन्वये आरोपपत्र दाखल केले आहे. हा खटला न्यायालयात सुनावणी साठी प्रलंबित आहे. महाराष्ट्र सरकारने मृतक सुधाकर गंगाधर येरपुडे यांच्या कायदेशीर प्रतिनिधीला २ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली असून ती ५ ऑक्टोबर २००२ रोजी शासनाने दिलेल्या निर्णयानुसार देण्यात आली आहे. हे लक्षात घेऊन ही याचिका निकाली काढण्यात यावी.

१३. जेव्हा उत्तरवादी राज्याने २ लाख रुपये जमा केले तेव्हा याचिकाकर्तीने कथित रक्कम काढण्यासाठी अर्ज केला, ज्यावर या न्यायालयाने खालील टिप्पणी केली:-

> "आम्ही संबंधित पक्षकारांचे संबंधित विद्वान वकिलांनी केलेल्या युक्तिवादांचा विचार केला आहे. राज्य सरकारने दाखल केलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर सकृतदर्शनी हे स्पष्ट झाले आहे की, हे पोलीस कोठडीत झालेल्या मृत्यूचे प्रकरण आहे. गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या तपासात देखील सकृतदर्शनी समोर आले आहे की याचिकाकर्तीचे पती सुधाकर येरपुडे यांचा पोलिसांच्या ताब्यात असताना संबंधित पोलिसांनी केलेल्या मारहाणी मुळे मृत्यू झाला. हे अत्यंत दुर्दैवी आहे की पोलीस

कोठडीत चौकशी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांना अनेक निर्देश दिलेले असतानाही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाकडे दुर्लक्ष करत, पोलीस कोठडीत चौकशी करत आहेत, ही धक्कादायक स्थिती उघड होते. किमान पोलीस विभागाकडून सर्वोच्च न्यायालयाने तसेच या न्यायालयाने कोठडीत चौकशी करताना पोलीस विभागाने कोणती पावले उचलणे आवश्यक आहे याविषयी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याची अपेक्षा आम्ही करतो. आपण हे व्यक्त केले पाहिजे की मृत व्यक्तीच्या पत्नी आणि मुलांचे नुकसान भरून काढण्यासाठी पैशाच्या रूपात भरपाई देणे पुरेसे नाही. सुधाकर येरपुडे यांच्या निधनामुळे झालेले नुकसान हे न भरून निघणारे नुकसान आहे आणि संपूर्ण कुटुंबाला केवळ आर्थिक संकटातून जावे लागत नाही तर संपूर्ण कुटुंबासाठी हा एक मानसिक आघात आहे आणि त्यातून बाहेर येण्यासाठी त्यांना बराच वेळ लागेल."

१४. या न्यायालयाने याचिकाकर्तीला अंतरिम भरपाई म्हणून ती रक्कम काढण्याची परवानगी दिली आहे आणि पुढे असे निरीक्षण नोंदवले आहे की, नुकसान भरपाईची अंतिम रक्कम फौजदारी रिट याचिकेच्या अंतिम सुनावणीच्या वेळी विचारात घेतली जाईल आणि ठरविली जाईल आणि वरील अटींमध्ये फौजदारी अर्ज क्रमांक २५९०/२००२ निकाली काढला.

१५. हा असा खटला आहे जिथे उत्तरवादी राज्याने, याचिकाकर्तीने, राज्य आणि त्याचे अधिकारी म्हणजेच लकडगंज पोलिस स्टेशन आणि गिट्टीखदान पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी, ह्यांच्या विरोधात केलेल्या आरोपांवर आक्षेप घेतला नाही उलटपक्षी गिट्टीखदान पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या अत्याचारामुळे पोलीस कोठडीत मृत्यु झाल्याचे मान्य करत पीडित ह्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसानभरपाई म्हणून राज्याने स्वतः २ लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली आहे.

१६. या पार्श्वभूमीवर मृतक सुधाकर येरपुडे यांच्या कोठडीतील मृत्युसाठी याचिकाकर्ती व त्यांची मुले पात्र असलेल्या नुकसानभरपाईचा एकच प्रश्न या न्यायालयाला विचारात घ्यायचा होता. सुनावणीदरम्यान, या न्यायालयाने व्यक्त केले की, सर्व वस्तुस्थिती आणि परिस्थिती जी उत्तरवादी राज्याद्वारे विवादित नाहीत, विचारात घेता, २ लाख रुपयांची नुकसान भरपाई खूपच कमी होती आणि राज्याने याचिकाकर्तीला वाजवी नुकसान भरपाई देणे योग्य ठरेल. विद्वान सहायक सरकारी वकील यांनी सादर केले की ते गृह विभागाकडून याबाबत पुढील सूचना मागतील आणि न्यायालयासमोर निवेदन करतील, अन्यथा प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवण्यात येईल.

१७. हा मुद्दा सरकारच्या प्रत्यक्ष विचाराधीन असल्यामुळे, आम्ही उत्तरवादी राज्याला याचिकाकर्तीला योग्य नुकसान भरपाई देण्याची आणखी एक संधी दिली. ह्या प्रकरणात ७.०१.२००५ रोजी, उत्तरवादी-राज्याने श्री. पी. टी. गौड, महाराष्ट्र शासनाचे सहसचिव, गृह

विभाग यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. न्यायालय कोणत्याही उत्तरा दाखल-प्रतिज्ञापत्रावर विचार करणार नाही, असा आमचा स्पष्ट आदेश असूनही आम्ही राज्याच्या वतीने दाखल केलेले प्रतिज्ञापत्र रेकॉर्ड (अभिलेख) वर घेतले आहे. उत्तरवादी-राज्याने घेतलेली भूमिका ही कबूल असल्याप्रमाणे, पोलीस कोठडीत मृत्यु झालेल्या पीडित, ह्यांची विधवा आणि मुलांबद्दलची प्रतिकूल वृत्ती दर्शवते. सुधाकर येरपुडे यांच्या मृत्युला पोलीस अधिकारी जबाबदार नाहीत हे दाखवण्यासाठी राज्य सरकारने राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जो मृतकाच्या वारसांना देय भरपाईचा विचार देखील करतो, ह्यांच्या कडे अहवाल पाठवला आणि पूर्वीच्या याचिकेत घेतलेल्या याचनेची पुनरावृत्ती केली. उत्तरा दाखल-प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ५ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की त्यानंतर मृत व्यक्तीला गुन्हा क्र. २७२/२००२ मध्ये पोलीस स्टेशन गिट्टीखदानच्या तपास अधिकाऱ्याने चौकशीसाठी बोलाविले होते. चौकशी दरम्यान, मृतकाने छातीत दुखण्याची तक्रार केल्याने, त्यांना तातडीने मेयो रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र तिथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. मृत्युची माहिती मिळाल्यानंतर पुढील तपास नागपूरच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या तपासानंतर, २.३.२००२ रोजी भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२, ३३० आणि ३४२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा क्र. ७६/२००२ पोलीस सब इन्स्पेक्टर एस. डी. राठोड, हेड कॉन्स्टेबल तिवारी, हेड कॉन्स्टेबल मतीन आणि पोलीस कॉन्स्टेबल मिश्रा यांच्या विरोधात गिट्टीखदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आणि सर्व पोलीस अधिकाऱ्यांना ११.०४.२००२ रोजी अटक करण्यात आली. प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे की, पोलीस कोठडीतील

मृत्युच्या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात आली आहे आणि त्याची चौकशी केली जाईल आणि कायद्यानुसार तार्किक निष्कर्षापर्यंत नेले जाईल.

१८. नुकसान भरपाई देण्याबाबत राज्य शासनाने मृतकाच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार मृतकाच्या वारसांना २ लाख रुपयांची नुकसान भरपाई यापूर्वीच देण्यात आली असून आतापर्यंत अशा प्रकरणात देण्यात आलेली जास्तीत जास्त नुकसान भरपाई २ लाख रुपयांपेक्षा जास्त झालेली नाही, या कारणास्तव ती रास्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

१९. प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ९ मध्ये, संबंधित पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्यावर कायद्यानुसार खटला चालविण्यात येत आहे असे म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना अद्याप शिक्षा झालेली नाही. छळामुळे मृत्यू झाल्यास, वस्तुस्थितीचा वादग्रस्त प्रश्न निर्माण होतो आणि नुकसानभरपाईसाठी दावा दाखल करणे हाच योग्य उपाय ठरेल, असे नम्रपणे नमूद केले जाते.

२०. प्रतिज्ञापत्रात हे न्याय्य ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे की, राज्य सरकारने मृतकाच्या वारसांना यापूर्वीच २ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली असली तरीही न्यायालयाने केलेल्या सूचनेनुसार आणि खटल्याची वस्तुस्थिती व परिस्थिती पाहता राज्य

सरकारने या प्रकरणाचा अधिक विचार केला आहे आणि १ लाख रुपये अतिरिक्त नुकसान भरपाई देण्याची तयारी दर्शविली आहे म्हणजेच कोठडीतील मृत्यु प्रकरणात एकूण नुकसान भरपाई ३ लाख रुपये इतकी होईल. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर अकाली भार पडेल आणि एक पूर्वोदाहरण बसेल म्हणून याअधिक भरपाई देणे न्याय्य आणि योग्य ठरणार नाही, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. विशेष करून या प्रकरणात मृत व्यक्तीकडून चोरीची काही मालमत्ता जप्त करण्यात आली आणि खटला प्रलंबित असल्यामुळे, मंजूर केलेली नुकसान भरपाई न्याय्य आणि वाजवी आहे आणि म्हणूनच, या न्यायालयाने ३ लाख रुपयांच्या भरपाईवर याचिका निकाली काढली पाहिजे आणि या प्रकरणात न्यायालयाने योग्य आदेश दिल्यानंतर मृत व्यक्तीच्या वारसांना १ लाख रुपयांची रक्कम तात्काळ दिली जाईल.

२१. ही अशी घटना आहे जिथे याचिकाकर्तीचे पती सुधाकर येरपुडे यांना दोन वेळा पोलिस स्टेशन मध्ये चुकीच्या पद्धतीने ताब्यात ठेवण्यात आले आणि त्यांचा छळ करण्यात आला. पहिल्यांदाच त्याला तीन दिवस बंदिस्त ठेवण्यात आले आणि पोलिसांकरवी मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला आणि जेव्हा त्याने पोलीस अधिकाऱ्यांना हवे तितके सोने, चांदी आणि १५,०००/- रुपये रोख रक्कम पोलीस अधिकाऱ्यांना लाच म्हणून दिली तेव्हाचं त्याची सुटका करण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे आणि उत्तरवादी-राज्याने ती नाकारली नाही आणि या बाबतीत याचिकाकर्तीवर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. आमच्या मते, याचिकाकर्तीच्या पतीला लकडगंज पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी बंदिस्त ठेवण्याची पहिली घटना म्हणजे ९.२.२००२ ते ११.२.२००२ या कालावधीत घडली,

आणि लाच म्हणून १३० ग्रॅम सोने, १०० ग्रॅम चांदी आणि १५,०००/- रुपयांची रोख रक्कम घेणे हे कृत्य म्हणजे गैर बंदिवास आणि कोठडीतील छळाचे आहे आणि हे भा.द.वि च्या कलम ३३० अन्वये दंडनीय आहे आणि हे सगळे मृतक सुधाकर येरपुडे यांच्या विरोधात कोणताही गुन्हा दाखल नसताना घडलेले आहे आणि डी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य[1], यांच्या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे उल्लंघन आहे. उपरोक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३५ मध्ये प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ही मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत, जी खालीलप्रमाणे आहेतः-

“(१) अटक करणाऱ्या आणि अटक केलेल्या व्यक्तीची चौकशी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांजवळ अचूक, दृश्यमान आणि स्पष्ट ओळख(पत्र) आणि पदनामांसह नावाची पाटी (टॅग) असणे आवश्यक आहे. अटक केलेल्या व्यक्तीची चौकशी करणाऱ्या अशा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांची माहिती रजिस्टरमध्ये नोंदवली गेली पाहिजे.

(२) अटक होणाऱ्या व्यक्तीला अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने अटकेच्या वेळी 'अटकेचा मेमो' तयार करावा आणि अशा मेमोला किमान एका साक्षीदाराने, जो अटक केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाचा सदस्य किंवा ज्या ठिकाणाहून अटक करण्यात आली आहे त्या परिसरातील सन्माननीय व्यक्तीने साक्षांकित करावे. तसेच अटक केलेल्या व्यक्तीकडून प्रतिस्वाक्षरी घेतली जावी आणि त्यात अटकेची वेळ आणि तारीख लिहिलेली असावी.

(३) ज्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे किंवा बंदिस्त करण्यात आले आहे आणि पोलिस स्टेशन किंवा चौकशी केंद्र किंवा इतर लॉक-अपमध्ये ताब्यात ठेवण्यात आले आहे

आणि जर अटकेचा मेमो साक्षांकित करणारा साक्षीदार स्वतःच त्याचा मित्र किंवा नातेवाईक नसेल तर ती व्यक्ती शक्य तितक्या लवकर आपल्या एका मित्राला किंवा नातेवाईकाला किंवा त्याच्या कल्याणात हितसंबंध असलेल्या इतर व्यक्तीला, त्याला अटक करण्यात आली आहे आणि त्या विशिष्ट ठिकाणी बंदिस्त ठेवण्यात आले आहे, अशी माहिती देण्याचा हकदार असेल.

(४) अटक झालेल्या व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक जिल्ह्याबाहेर किंवा शहराबाहेर राहत असेल तर त्याच्या अटकेची वेळ, अटकेचे ठिकाण आणि पोलिसांनी अटक केलेल्या व्यक्तीला जिथे बंदिस्त ठेवले आहे ते ठिकाण ह्याची माहिती पोलिसांनी जिल्ह्यातील कायदेशीर मदत संस्थेमार्फत किंवा संबंधित क्षेत्रातील पोलिस स्टेशनच्या मार्फत अटक झाल्यानंतर ८ ते १२ तासांच्या कालावधीत टेलिग्राफच्या माध्यमातून सूचित केली पाहिजे.

(५) अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या अटकेची किंवा स्थानबद्धतेची माहिती कोणाला तरी देण्याच्या अधिकाराबाबत तसेच त्याला अटक करण्यात आले आहे किंवा स्थानबद्धत केले आहे ह्याबाबत अवगत करून देण्यात आले पाहिजे.

(६) अटकेच्या ठिकाणी असलेल्या डायरीमध्ये त्या व्यक्तीच्या अटकेबाबत नोंद करणे आवश्यक आहे आणि त्यामध्ये त्या व्यक्तीच्या मित्राचे देखील नाव उघड झाले पाहिजे ज्यास त्या व्यक्तीच्या अटकेची माहिती देण्यात आली होती आणि ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यात अटक झालेला व्यक्ती आहे त्या पोलीस अधिकाऱ्याची नावे आणि तपशील देखील डायरीत नमूद करणे आवश्यक आहे.

(७) अटक केलेल्या व्यक्तीची, त्याने अशी विनंती केल्यास, त्याच्या अटकेच्या वेळी त्याची तपासणी केली जावी आणि गंभीर आणि किरकोळ जखमा, जर त्याच्या शरीरावर असतील तर, त्या वेळी  त्या नोंदवल्या जाव्यात. 'तपासणी पत्रकावर' वर अटक करण्यात आलेला व्यक्ती आणि अटक करणारा  पोलीस अधिकारी या दोघांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे आणि त्याची प्रत अटक झालेल्या व्यक्तीस प्रदान करण्यात यावी.

(८) संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या आरोग्य सेवा संचालकांनी नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त डॉक्टरांच्या पॅनलवरील प्रशिक्षित डॉक्टरांनी ताब्यात घेतलेल्या व्यक्तीची दर ४८ तासात वैद्यकीय तपासणी करावी. आरोग्य सेवा संचालकांनी सर्व तालुके आणि जिल्ह्यांसाठी अशाप्रकारचे पॅनेल तयार करावे.

(९) वर नमूद सर्व कागदपत्रांच्या प्रती, वर नमूद अटकेचे मेमो सह, इलाका दंडाधिकाऱ्यांना त्यांच्या नोंदीसाठी पाठवाव्यात.

(१०) अटक केलेल्या व्यक्तीला चौकशीदरम्यान त्याच्या वकिलाला भेटण्याची परवानगी दिली जाऊ शकते, परंतु संपूर्ण चौकशीदरम्यान अशी परवानगी दिली जाऊ शकत नाही.

(११) सर्व जिल्हा आणि राज्य मुख्यालयांमध्ये एक पोलीस नियंत्रण कक्ष असावा, जेथे अटकेची माहिती आणि अटकेचे स्थान याबाबत अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने, अटक घडवून आणण्याच्या १२ तासांच्या आत,  माहिती द्यावी, आणि  पोलीस नियंत्रण कक्षामध्ये ते दर्शनिय सूचना फलकावर प्रदर्शित केले जावे. "

२२. १९९७ सीआरआय. एल.जे. ६१० मधील डी. के. बासू (वर उल्लेखित) ह्या प्रकरणात नमूद केलेल्या उपरोक्त प्रतिबंधात्मक उपायांपैकी मार्गदर्शक तत्त्वे क्रमांक (1) ते (10) चे पूर्णपणे उल्लंघन झाले आहे. म्हणूनच आम्ही ही एक स्वतंत्र घटना मानतो, ज्यासाठी या न्यायालयाच्या मते, पीडिताच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई द्यावी लागेल, कारण तो आता जिवंत नाही.

२३. आणखी एक घटना कोठडीतील छळामुळे पीडित ह्याचा मृत्यू झाल्याची आहे, ती म्हणजे सुधाकर येरपुडे, ज्याला गिट्टीखदान पोलिस स्टेशनने २७.२.२००२ रोजी रात्री ११ ते ११.३० वाजता त्याच्या घरातून अटक केली होती आणि पोलिस अधिकाऱ्यांकडून होणारा छळ सहन न झाल्याने पोलिस स्टेशनमध्येच त्याचा मृत्यू झाला आणि मेयो हॉस्पिटलमध्ये नेऊन तपासणी केली असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पीडित पोलीस स्टेशन मध्ये असताना पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला घरी जाऊ देण्यासाठी ५०,०००/- रुपयांची मागणी केली. याचिकाकर्ती अशा असहाय स्थितीत असल्याने ती त्यांची मागणी पूर्ण करू शकली नाही. तिने पोलीस अधिकाऱ्यांना विनंती केली की तिचा पती हृदयविकाराचा रुग्ण असल्याने आणि त्याला आपल्यासोबत काही आवश्यक औषधे घेऊन जाऊ द्यावीत, मात्र पोलिसांनी तिची विनंती नाकारली. आमच्या मते ही अटक आणि दिवंगत सुधाकर यांना बंदिस्त ठेवणे हे सर्वोच्च न्यायालयाने १९९७ सीआरआय. एल.जे. ६१० मधील डी.के.बासू (वर उल्लेखित) ह्या प्रकरणात घालून दिलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांच्या विरुद्ध आहे.

२४. श्री. पी. टी. गौड, महाराष्ट्र शासनाचे सहसचिव, गृह विभाग यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात केलेला युक्तिवाद आम्हाला खरोखरच मजेशीर वाटला, त्यात त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे किंवा न्याय्य ठरविण्याचा प्रयत्न केला आहे की दुसऱ्या घटनेच्या बाबतीत, गुन्हा क्रमांक २७२/२००२ मध्ये चौकशीसाठी मृतकाला तपास अधिकाऱ्याने पोलिस स्टेशनला बोलावले होते आणि मृतकाची चौकशी सुरू होती, मृतकाला छातीत दुखू लागल्याने त्याला तातडीने मेयो रुग्णालयात हलविण्यात आले, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले, जे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (गुन्हे) तपास पूर्ण केल्यानंतर आणि पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केल्यानंतर हे खोटे असल्याचे सिद्ध झाले आहे. मृतकाचा मृत्यु कोठडीतील छळामुळे झाला नसल्याच्या दावा शवविच्छेदन अहवालच्या विरुद्ध आहे. या न्यायालयासमोर दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ५ मध्ये असा दावा करण्यापूर्वी राज्याच्या गृह विभागातील उच्च पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याने किमान या प्रकरणाच्या तपशीलाचे परीक्षण केले असावे अशी अपेक्षा होती. परंतु महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाचे सहसचिव दर्जाचे अधिकारी सुद्धा, सुधाकर येरपुडे किंवा त्याचे कुटुंब रु. ५०,०००/- ची रक्कम देण्याच्या स्थितीत नसल्याने त्याचा, पोलीस कोठडीत झालेल्या त्याच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या पोलिसांच्या गुन्ह्यांवर पडदा टाकण्यास कचरले नाहीत. जर ह्या पोलीस अधिकाऱ्यांना ते पैसे मिळाले असते तर त्यांनी त्याला मुक्त केले असते. त्यामुळे, याचिकाकर्तीच्या दाव्यामध्ये आम्हाला काही शंका नाही की तिच्या पतीला तिच्या घरात मारहाण करण्यात आली आणि पोलिस जीप पर्यंत खेचून गिट्टीखदान पोलिस स्टेशनला नेण्यात आले आणि तिथे निर्दयपणे मरेपर्यंत मारहाण केली, हे सत्य राज्य गुन्हे अन्वेषण

विभागा(गुन्हे) ह्यांनी तपास केल्यानंतरही सिद्ध झाले आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी केलेल्या खून आणि ह्या दरम्यान त्यांनी केलेल्या इतर गुन्ह्यांसाठी त्यांच्याविरुद्ध खटला चालविल्या जात आहे. अभिलेखावरील वैद्यकीय पुरावा म्हणजेच शवविच्छेदन अहवाल आहे, ज्यात मृत व्यक्तीचा मृत्यू कशामुळे झाला हे प्रतिबिंबित होते, जे शवविच्छेदन चाचणी करणाऱ्या डॉक्टरांच्या निम्नलीखीत मतावरून दिसून येतेः-

"मत"

(i) मृत्यूनंतरची संभाव्य वेळ (चौकशीदरम्यान निरीक्षणासह सर्व घटक ठेवणे) १२ते २४ तास.

(ii) मृत्यूचे कारण आणि पद्धत- माझ्या माहिती आणि विश्वासानुसार मृत्यूचे कारण आहेः-

"(अ) तात्काळ कारण- "धक्का."

(ब) रेट्रोपेरिफोनियल रक्तस्त्राव आणि उजव्या मूत्रपिंडात दुखापत.

(क) जखमांपैकी कोणत्या जखम मृत्युपूर्व/मृत्यु नंतरच्या आहेत आणि मृत्युपूर्व असल्यास कालावधी?:

मृत्युपूर्व, ताजे."

२५. त्यामुळे दिनांक ७ जानेवारी २००५ रोजी उत्तरवादी- राज्याच्या वतीने महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाचे सह-सचिव श्री. पी. टी. गौड यांनी या न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटल्याप्रमाणे, मृतकाच्या पोलीस कोठडीतील मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्याच्या निकालाची वाट

पाहण्याची गरज नाही, असे आमचे मत आहे. सदर प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ९ मध्ये राज्याने असा दुसरा युक्तिवाद नम्रपणे सादर केला आहे की, छळ करणाऱ्या कृत्यामुळे मृत्यू झाल्यास, वस्तुस्थितीचा विवादित प्रश्न उद्भवतो आणि नुकसान भरपाईच्या वसुलीसाठी दावा दाखल करणे हा योग्य उपाय आहे. सर्वोच्च न्यायालय आणि आपल्या उच्च न्यायालयाचे विविध निर्णय, ज्यापैकी काही निर्णयांचा आपण संदर्भ घेणार आहोत त्या निर्णयांचा विचार करून, आमची निश्चितपणे धारणा होती की अशा पीडितांची नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली पाहिजे आणि नुकसान भरपाई न्यायोचित आणि सहन केलेल्या चुकीच्या कृत्याशी अनुरूप असावी. हे खरेच आश्चर्यकारक आहे की सह सचिवांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे, सदर प्रकरण वस्तुस्थितीचा विवादित प्रश्न उद्भवणारा आहे , त्यामुळे नुकसान भरपाईच्या वसुलीसाठी दावा दाखल करणे हा योग्य उपाय असेल. आम्ही राज्याला, वर उद्धृत केलेल्या डी. के. बासिल, १९९७ क्री. एल. जे. ७४३ च्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांची आठवण करून देऊ शकतो, ज्यामध्ये *"जेथे अधिकार आहे, तेथे उपाय आहे"* या तत्त्वाचा पुनरुच्चार करून खालीलप्रमाणे निरीक्षण केले गेले आहे :-

> "असे कोणतेही अपकृत्य नाही ज्यावर उपाय नाही. कायद्याची इच्छा आहे की अश्या सगळ्या प्रकरणात ज्यामध्ये एखाद्या माणसावर अन्याय झाला आहे आणि त्याचे जीवाला हानी झाली आहे, तेव्हा त्याच्यावर उपाय असायलाच हवा. केवळ एखाद्या कारवाईला अवैध घोषित करणे किंवा कोठडीतील हिंसाचार किंवा पोलीस कोठडीतील मृत्यू झाल्याचे निष्कर्ष काढणे, त्या व्यक्तीला स्वतःहून कोणताही

अर्थपूर्ण उपाय प्रदान करत नाही, ज्या व्यक्तीच्या जीवनाच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन केले गेले आहे. अजून बरेच काही करण्याची गरज आहे. जीवनाच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन केल्याबद्दल नुकसान भरपाई देण्याची भारतीय राज्यघटनेत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. तथापि सर्वोच्च न्यायालयाने स्थापित राज्य घटनाबाह्य वैयक्तिक स्वातंत्र्य किंवा जीवन जगण्यापासून वंचित केल्याचे प्रकरणामध्ये, न्यायिकदृष्ट्या नुकसान भरपाईचा अधिकार विकसित केला आहे. गुन्ह्यासाठी योग्य शिक्षा (भलेही नुकसान भरपाई) देण्याचे काम त्या फौजदारी न्यायालयांवर सोडले पाहिजे, ज्यामध्ये गुन्हेगारांवर खटला चालविला जातो आणि हे कायद्याप्रमाणे राज्यास बंधनकारक आहे. सार्वजनिक कायद्याच्या अधिकारक्षेत्रात नुकसानीसाठी दिवाणी दाव्यासारख्या इतर कोणत्याही कारवाईचा पूर्वग्रह न ठेवता जो पीडित व्यक्तीला किंवा पीडित मृतकाच्या वारसांना कायदेशीररित्या उपलब्ध आहे, त्याच प्रकरणाच्या संदर्भात राज्याच्या कार्याधिकाऱ्यांनी केलेल्या अपकृत्याबद्दल नुकसान भरपाई सुद्धा दिली जाते. अर्थातच, नुकसान भरपाईची रक्कम प्रत्येक प्रकरणाच्या विशिष्ट तथ्यांवर अवलंबून असेल आणि त्यादृष्टीने कोणतेही *'पारंपरिक कठोर प्रतिबंधात्मक उपाय लागू करण्याचे सूत्र'* **तयार केले जाऊ शकत नाही.** नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर स्थापित केलेल्या आक्रमणासाठी सार्वजनिक कायद्याच्या अधिकारक्षेत्रांतर्गत चुकीच्या निवारणासाठी अश्या रीतीने दिलेली मदत पारंपारिक उपायांव्यतिरिक्त आहे आणि त्याचा अवमान करण्यात नाही. एखाद्या प्रस्तुत प्रकरणात न्यायालयाने दिलेली भरपाईची

रक्कम आणि चुकीचे निवारण करण्यासाठी राज्याने दिलेली रक्कम, दिवाणी दाव्यात नुकसान भरपाईच्या रूपाने दावेदाराला देण्यात येणाऱ्या कोणत्याही रकमेशी समायोजित केली जाऊ शकते."

२६. या प्रकरणात, पहिल्यांदा पिडीतास तीन दिवसांसाठी बेकायदेशीरपणे नजरकैदेत ठेवण्यात आले होते आणि त्यांच्या तावडीतून बाहेर येण्यासाठी, १३० ग्रॅम वजनाचे सोने , १०० ग्रॅम वजनाचे चांदी आणि १५,००० रुपयांची लाच पोलिसांना देण्यास भाग पाडण्यात आले होते. दुसऱ्या वेळी, त्यांचे ताब्यात असताना त्याचा मृत्यूपर्यंत छळ करण्यात आला आणि त्यामुळे मृतक व्यक्तीची विधवा आणि मुलांना नुकसानभरपाईची रक्कम देण्याशिवाय उत्तरवादीकडे पर्याय नाही.

२७. नीलाबती बेहेरा (श्रीमती) उर्फ ललिता बेहेरा (सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती मार्फत) – विरुद्ध - ओडिशा राज्य [५१] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले :-

" घटनात्मक अधिकाराची अंमलबजावणी करणे आणि नुकसान भरपाई मंजूर करणे म्हणजे त्याच्या उल्लंघनाच्या कायदेशीर परिणामांचा एक भाग म्हणून नुकसानभरपाईचा पुरस्कार स्वीकारतो. सर्वोच्च न्यायालयाद्वारे अनुच्छेद ३२ अंतर्गत किंवा उच्च न्यायालयाद्वारे अनुच्छेद २२६ अंतर्गत कार्यवाहीमध्ये नुकसान भरपाई देणे हा सार्वजनिक कायद्यामध्ये उपलब्ध एक उपाय आहे, जो मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनासाठी कठोर दायित्वावर आधारित आहे

ज्यावर सार्वभौम प्रतिकारशक्तीचे तत्त्व लागू होत नाही, जरी तो खाजगी कायद्यात अपकृतीवर आधारित कारवाईमध्ये बचाव म्हणून उपलब्ध असू शकते. मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्याचे उल्लंघन केल्याबद्दल 'नुकसान भरपाईसाठी सार्वजनिक कायद्यातील मागणी', ज्याच्या संरक्षणाची घटनेत हमी दिलेली आहे, अश्या अधिकारांची अंमलबजावणी आणि संरक्षण एक मान्य उपाय आहे आणि मूलभूत अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी तरतूद केलेल्या घटनात्मक उपायांचा अवलंब करून कठोर दायित्वावर आधारित असा दावा वेगळा आहे आणि अपकृतीने मूलभूत हक्कांचे उल्लंघन केल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी खाजगी कायद्यातील उपायांच्या जोडीने आहे. सार्वभौम प्रतिकारशक्तीचा बचाव हा मूलभूत हक्कांच्या संकल्पनेला लागू ना होणारा आणि परका असल्याने, अशा प्रकारचा बचाव घटनात्मक उपायात उपायात उपलब्ध असल्याचा प्रश्नच उद्भवू शकत नाही. हेच तत्व राज्य घटनेने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन केल्याबद्दल आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे समर्थन करते जेव्हा राज्य किंवा त्याच्या सेवकांनी त्यांच्या अधिकारांचा कथित वापर करताना केलेल्या उल्लंघनासाठी निवारणाचा हा एकमेव व्यवहार्य मार्ग उपलब्ध असतो आणि मूलभूत अधिकारांचा अंमलबजावणीचा दावा राज्यघटनेअंतर्गत सार्वजनिक कायद्यातील उपायांचा म्हणजेच अनुच्छेद ३२ आणि २२६ चा अवलंब करून केला जातो, हे रुदूल साह च्या प्रकरणामध्ये दर्शविले गेले आहे आणि त्यानंतरचा निर्णयांचा आधार आहे ज्यामध्ये मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल अनुच्छेद ३२ आणि २२६ अंतर्गत नुकसान भरपाई देण्यात आली होती. रुदूल साह मधील आणखी काही निरीक्षणे आहेत, ज्यामुळे त्यात सूचित केलेल्या तत्वांचा प्रभाव कमी होऊ शकतो, त्या तत्त्वापासून खरोखरच विचलित होत नाहीत. 'रुदूल

साह आणि इतर' या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अशाच प्रकारे समजून घेतला पाहिजे आणि त्यातून कस्तुरीलाल (चे प्रकरण) भिन्न आहे. न्यायालय असहाय्य नाही आणि अनुच्छेद ३२ जे स्वतः एक मूलभूत अधिकार आहे, त्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाला दिलेले व्यापक अधिकार, न्यायालयावर अश्या नवीन साधनांची निर्मिती करण्याची घटनात्मक जबाबदारी टाकतात, जे संपूर्ण न्याय करण्यासाठी आणि राज्यघटनेत हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक आहे, जे योग्य प्रकरणांमध्ये आर्थिक नुकसान भरपाई देण्यास समर्थ करतात जिथे निवारणाचा हा एकमेव मार्ग उपलब्ध आहे. अनुच्छेद १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाला मिळणारे अधिकार देखील या संदर्भात एक समर्थ तरतूद आहे. याउलट दृष्टीकोण न्यायालयास केवळ शक्तिहीन करेल आणि घटनात्मक हमी मृगजळवत आशा ठरेल, इतकेच नाही तर गुन्ह्यासाठी वाईट कृत्य करणाऱ्यास शिक्षा देणे आणि सामान्य प्रक्रियेद्वारे खाजगी कायद्यांतर्गत नुकसान भरपाई देणे याव्यतिरिक्त जर कोणत्याही सर्वोच्च उल्लंघनासाठी न्यायालयाला राज्य सरकारच्या विरुद्ध कोणताही अनुतोषण देण्याची शक्ती नसेल, तर ते काही विशिष्ट परिस्थितींमध्ये जीवन संपविण्यासाठी प्रोत्साहन राहील. कायद्यानुसार जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ शकत नाही ही हमी जर खरी असेल तर, प्रत्येक उल्लंघनाच्या बाबतीत हक्काची अंमलबजावणी करणे देखील घटनात्मक योजनेत शक्य असले पाहिजे, ज्याचे निवारण करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीनुसार योग्य ती उपाययोजना केली पाहिजे. सार्वजनिक कायद्यातील हा उपाय खाजगी कायद्यातील त्यांच्या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी साधन नसलेल्या व्यक्तींद्वारे आवाहन केल्यावर अधिक सहज उपलब्ध

असणे आवश्यक आहे, जरी त्याचा वापर जेथे अधिक योग्य असेल, तेथे न्यायिक निग्रहाने खाजगी उपायांचा आडमार्गीपणा सौम्य करण्यासाठी आहे.

नागरी आणि राजकीय हक्कांचे आंतरराष्ट्रीय करार, १९६६ चे अनुच्छेद ९ (५) (ज्यात म्हटले आहे : "जो कोणी बेकायदेशीर अटक किंवा स्थानबद्धतेचा बळी ठरला असेल त्याला नुकसानभरपाईचा अंमलबजावणीयोग्य हक्क असेल.") हे देखील दर्शविते की नुकसानभरपाईचा अंमलबजावणी योग्य हक्क हा हमी दिलेल्या हक्कांच्या अंमलबजावणीच्या संकल्पनेसाठी परका नाही.

२८. त्यानंतर छळ आणि कोठडीतील मृत्यूची प्रकरणे हाताळताना, सर्वोच्च न्यायालयाने कोठडीतील मृत्यूच्या प्रकरणांशी संबंधित पोलिसांच्या प्रवृत्तीबद्दल तीव्र शब्दांत नापसंती दर्शविली आहे आणि खालील प्रमाणे निरीक्षण नोंदवून आपली चिंता व्यक्त केली आहे :- (पहा डी. के. बसू - विरुद्ध- पश्चिम बंगाल राज्य) [१०१].

"कोठडीतील हिंसाचार ज्यात कोठडीतील छळ आणि मृत्यू यांचा समावेश आहे, कायद्यांतील नियमांवर प्रहार करते, ज्यात कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकारकायद्यापासून वंचित न ठेवता, मर्यादित ठेवावे, अशी मागणी केली आहे. कोठडीतील हिंसाचार हा चिंतेचा विषय आहे. नागरिकांचे संरक्षण करणाऱ्या व्यक्तीनींच हे कृत्य केल्यामुळे सदर बाब अधिक गंभीर झाली आहे. पीडित पूर्णपणे असहाय्य असताना, पोलीस ठाण्यातील चार भिंतीत किंवा कोठडीतील

गणवेश आणि अधिकाराच्या ढालीखाली हे कृत्य केलेले आहे. स्वतंत्र समाजात पोलीस आणि इतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून एखाद्या व्यक्तीचा छळ आणि अत्याचारापासून संरक्षण ही चिंतेची बाब आहे.राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ आणि २२ द्वारे हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन सुस्थापित झाल्यावर आर्थिक नुकसान भरपाई दिली पाहिजे किंवा नाही यासोबतच पोलिसांच्या अधिकारांशी संबंधित महत्वाचे मुद्दे या याचिकांमध्ये उपस्थित केले आहेत. सदर मुद्दे मूलभूत आहेत.

एका माणसावर दुसऱ्या माणसाकडून होणार "छळ" मूलतः "दुर्बळांवर" यातनाद्वारे "बळवंतांची" इच्छा लादण्याचे साधन आहे. 'छळ' हा शब्द आज मानवी संस्कृतीच्या नकारात्मक बाजूचा समानार्थी बनला आहे. पोलीस कोठडीतील सर्व गुन्ह्यांमध्ये केवळ शरीराचे दुखणे नव्हे तर पोलीस ठाण्याच्या किंवा कोठडीतील चार भिंतीमध्ये एखाद्या व्यक्तीला होणारी मानसिक वेदना ही खरी चिंतेची बाब आहे. पोलीस कोठडीत शारीरिक हल्ला असो किंवा बलात्कार असो, त्या व्यक्तीने अनुभवलेल्या मानसिक त्रासाची व्याप्ती कायद्याच्या कक्षेबाहेरची आहे. "कोठडीतील छळ" म्हणजे मानवी प्रतिष्ठेचे आणि अधोगतीचे खुले उल्लंघन आहे, जे बऱ्याच प्रमाणात व्यक्तिमत्त्वाचा ऱ्हास करते. हा मानवी प्रतिष्ठेवर केलेला सुनियोजित हल्ला आहे आणि जेव्हा जेव्हा मानवी प्रतिष्ठेला इजा पोहोचते, तेव्हा तेव्हा सभ्यता एक पाऊल मागे जाते, अश्या प्रत्येक प्रसंगी

माणुसकीचा झेंडा अर्धवट फडकला पाहिजे.

पोलीस कोठडीतील मृत्यू हा कदाचित सुसंस्कृत, कायदेशीर समाजातील सर्वात वाईट गुन्ह्यांपैकी एक आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ आणि २२ (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या अधिकारांचे हेतुपूर्वक आणि काटेकोरपणे संरक्षण करणे आवश्यक आहे. अनुच्छेद २१ मधील जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य या अभिव्यक्तीमध्ये मानवी प्रतिष्ठेसह जगण्याचा अधिकार समाविष्ठ आहे आणि अश्या प्रकारे राज्य किंवा त्याच्या पदाधिकाऱ्याकडून छळ आणि हल्ल्याचे विरुद्ध हमी देखील त्यात समाविष्ठ आहे. कायद्याने परवानगी दिल्याप्रमाणे वाजवी निर्बंध घालून कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रिये शिवाय, अनुच्छेद २१ द्वारे दिली गेलेली मौल्यवान हक्काची हमी दोषी, न्यायचौकशीधीन, स्थानबद्ध आणि इतर कैद्यांना नाकारली जाऊ शकत नाही. एखाद्या नागरिकाला पोलिसांनी अटक केल्याक्षणी तो जगण्याचा मूलभूत हक्क गमावतो असे म्हणता येणार नाही. तसेच एखाद्या नागरिकांच्या अटकेनंतर त्याच्या जगण्याच्या अधिकारावर स्थगिती दिली जाऊ शकते हे सुद्धा म्हणता येणार नाही. कोणत्याही प्रकारचा छळ किंवा क्रूरता, अमानवीय किंवा अपमानास्पद वागणूक हे अनुच्छेद २१ मधील अंतर्निरोधनाच्या कक्षेत येईल, मग ती तपास, चौकशी किंवा इतर कोणत्याही वेळी घडलेली असो. जर सरकारचे पदाधिकारी कायदा मोडणारे बनले तर कायद्याचा अवमान होईल आणि बेबंदशाहीला प्रोत्साहन मिळेल हे निश्चित, तसेच प्रत्येक माणसामध्ये कायदा स्वतःच्या हाती घेण्याची प्रवृत्ती निर्माण होईल ज्यामुळे अराजकता माजेल.

कोणताही सुसंस्कृत देश असे होऊ देऊ शकत नाही नागरिकांच्या पायाभूत आणि मूल मानवी हक्कांचे रक्षक आणि संरक्षक म्हणून सर्वोच्च न्यायालय ही समस्या दूर करू शकत नाही. देशाच्या हितासाठी स्थानबद्ध कैदी, गुन्हेगार किंवा अटक केलेल्या व्यक्तीच्या चौकशीचे अधिकार संबंधित व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारापेक्षा वरचढ असला पाहिजे. 'salus popult suprema lex' (लोकांची सुरक्षितता हा सर्वोच्च कायदा आहे) आणि 'salus republicae suprema lex' (राष्ट्राची सुरक्षा हा सर्वोच्च कायदा आहे) ह्या लॅटिन म्हणी सह-अस्तित्वात आहे आणि केवळ महत्वाच्या आणि प्रासंगिकच नाही तर एखाद्या व्यक्तीचे कल्याण समाजाच्या कल्याणासाठी झाले पाहिजे या सिद्धांताच्या केंद्रस्थानी आहे. राज्याची कृती मात्र "बरोबर, न्याय्य आणि नि: पक्ष " असली पाहिजे. कोणत्याही प्रकारची माहिती काढण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या छळाचा वापर करणे "बरोबर, न्याय्य किंवा नि: पक्ष " नाही आणि म्हणून, अनुच्छेद २१ ला आक्षेपार्ह असल्याने, अनुज्ञेय नसेल. अशा गुन्ह्याच्या संशयिताची चौकशी खरोखरच कायद्याच्या तरतुदींनुसार निर्धारित- अविरत आणि वैज्ञानिक चौकशीचे अधीन राहून केली पाहिजे. तथापि माहिती काढणे, कबुलीजबाब मिळविणे किंवा त्याच्या साथीदारांबद्दल व शस्त्रास्त्रे इत्यादींबद्दल माहिती मिळविण्याच्या हेतूने त्याचा छळ केला जाऊ शकत नाही किंवा त्याच्यावर थर्ड डिग्री पद्धतीचा वापर करता येणार नाही किंवा त्याला संपविले जाऊ शकत नाही. सामान्य गुन्हेगाराच्या तुलनेत अशा व्यक्तीच्या चौकशीच्या पद्धतीत

गुणात्मक फरक असला, तरी त्याच्या घटनात्मक अधिकाराला कायद्याने परवानगी दिलेल्या पद्धतीने संकुचित करता येत नाही. दहशतवादाच्या आव्हानाला नाविन्यपूर्ण कल्पना आणि दृष्टिकोनातून सामोरे जावे लागेल. राज्य दहशतवाद ही दहशतवादाशी लढण्याची शक्ती नाही. राज्य दहशतवाद "दहशतवादाला" केवळ कायदेशीर मान्यता प्रदान करेल. हे राज्य, समुदाय आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कायद्याच्या नियमांसाठी वाईट असेल. त्यामुळे राज्याने हे सुनिश्चित केले पाहिजे की दहशतवादाचा सामना करण्यासाठी त्याच्याद्वारे तैनात केलेल्या विविध संस्था कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करतात आणि कायदा स्वतःच्या हाती घेत नाहीत. दहशतवाद्याने निर्दोष नागरिकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केल्यावर तो शिक्षेस पात्र ठरू शकतो, परंतु कायद्याने परवानगी दिलेल्या पद्धतीशिवाय त्याच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे समर्थन केले जाऊ शकत नाही. म्हणूनच आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तपासाची वैज्ञानिक पद्धती विकसित करणे आणि तपासकर्त्यांना योग्य चौकशी करण्यासाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

पोलिसांना कायदेशीर कर्तव्यांतर्गत आणि गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हेगाराला अटक करण्याचा आणि त्याची चौकशी करण्याचा कायदेशीर अधिकार आहे यात शंका नाही, परंतु गुन्ह्याची उकल करण्याच्या दृष्टीने थर्ड डिग्री पद्धती वापरण्याची किंवा चौकशी आणि तपासादरम्यान आरोपीचा छळ करण्याची परवानगी कायदा देत नाही. अंतिम हेतू साधनांचे समर्थन करू शकत नाही. गुन्ह्याची चौकशी आणि तपास हा खऱ्या अर्थाने उद्देश्यपूर्ण असावा जेणेकरून

तपास परिणामकारक होईल. एखाद्या व्यक्तीचा छळ करून आणि थर्ड डिग्री पद्धती वापरून, पोलीस बंद दरवाजाआड आपल्या कायदेशीर आदेशानुसार ज्या गोष्टींची मनाई आहे त्या गोष्टी साध्य करत आहेत. कुठलाही समाज याला परवानगी देऊ शकत नाही.”

२९. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा शकीला अब्दुल गफार खान (श्रीमती) - विरुद्ध- वसंत रघुनाथ धोबळे या प्रकरणात अलीकडेच दिलेल्या निर्णयात या प्रकरणातील आधीच्या सर्व प्राधिकरणांचा संदर्भ घेतल्यानंतर अशा प्रकरणांमध्ये विचारात घेण्यायोग्य तत्त्वांचा पुनरुच्चार केला आणि पहिल्या आठ परिच्छेदांमध्ये, या प्रकरणाचा विचार करण्यासाठी न्यायालयांना मार्गदर्शन करणारे तत्त्व ठळकपणे निदर्शनास आणले आहे. या निर्णयाचे पहिले आठ परिच्छेद सर्वांच्या, विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या हितासाठी सादर करणे आम्हाला आवश्यक वाटते, जेणेकरून गृह विभाग अशा प्रकरणांना सामोरे जाण्यासाठी मार्ग काढू शकेल. सदर परिच्छेद खालील प्रमाणे आहेत :-

"एकदा का तुम्ही आपल्या नागरिकांचा आत्मविश्वास गमावला तर तुम्ही त्यांच्याकडून सन्मान आणि प्रतिष्ठा परत मिळवू शकणार नाही. हे खरे आहे की, आपण सर्व लोकांना काही काळ आणि काही लोकांना नेहमीच मूर्ख बनवू शकता, परंतु आपण सर्व लोकांना नेहमीच मूर्ख बनवू शकत नाही”, असे अब्राहम लिंकन यांनी म्हटले आहे. या न्यायालयाने रघुबीर सिंग - विरुद्ध- हरियाणा राज्य [२] यांच्या प्रकरणात पोलिसांद्वारे कोठडीतील छळाविषयी तीव्र नापसंती दर्शविताना या

अजरामर निरीक्षणांची दाखल घेतली :- ( एस.सी.सी. पी. ७२, परि. ४) : (पान ८०१, क्रि. एल. जे. चे परि. ४ ).

२. कोठडीतील हिंसा, छळ आणि पोलीस अधिकाराचा गैरवापर हे या देशापुरते मर्यादित नसून व्यापक आहे. ही आन्तरराष्ट्रीय समुदायाची चिंतेचा विषयआहे कारण ही समस्या सार्वत्रिक आहे आणि आव्हान जवळ जवळ जागतिक आहे. १९४८ मध्ये मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा, जी काही मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण आणि हमी देण्याच्या जागतिक प्रवृत्तीच्या उदयास चिन्हांकित करते, त्यातील अनुच्छेद ५ मध्ये नमूद केले आहे की, "कोणालाही यातनापूर्वक किंवा क्रुर, अमानवी किंवा अपमानजनक वागणूक किंवा शिक्षा देण्यात येऊ नये." या पवित्र घोषणेनंतरही गुन्हेगारी अव्याहतपणे सुरु आहे, जरी प्रत्येक सुसंस्कृत देशाने आपली चिंता व्यक्त केली आहे आणि त्याचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

३. सध्याच्या काळात जर हे सगळीकडे भयावह प्रमाण धारण करीत असेल, तर ते शिर्षस्थानावरून लोकशाहीचे रक्षक आणि जनतेच्या अधिकारांचे रक्षणकर्ते असल्याची घोषणा करणाऱ्या कारभाराच्या सूत्रधारांनी अवलंबिलेल्या दुष्ट पद्धतीमुळे आहे आणि तरीही वैयक्तिक हिशोब बरोबर करण्यासाठी पडद्यामागे खालच्या पातळीवर जाऊन गणवेशातील आपल्या माणसांना मोकळीक देण्यास संकोच करत नाही, काय घडत आहे याची जाणीव ठेवत नाही आणि शांतताप्रिय, कर्मष्ठ आणि नागरिकांच्या हक्काचे रक्षणकर्ता असल्याचा सोंग करतात.

४. भारताच्या राजघटनेतील (थोडक्यात, राज्यघटना) प्रकाशमान तरतुदींपैकी

एक आणि मूलभूत हक्कांसाठीच्या योजनेचा एक भाग असलेल्या अनुच्छेद २१ ला घटनेत अभिमानास्पद स्थान आहे. सदर अनुच्छेदात असे आदेश दिले आहे की, कायद्याने स्थापित प्रक्रियेशिवाय कोणत्याही व्यक्तीला जगण्यापासून आणि वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवता येणार नाही. प्रत्येक नागरिकाच्या जीवनात हा पवित्र आणि आदरणीय हक्क म्हणजेच वैयक्तिक स्वातंत्र्याची महत्त्वाची भूमिका आहे. जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्यात, मानवी सन्मानाने जगण्याचा अधिकार समाविष्ट आहे. राज्य किंवा त्याच्या पदाधिकाऱ्यांद्वारे छळ किंवा हल्ल्याविरुद्ध अंगभूत हमी दिलेली आहे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (थोडक्यात, संहिता) चे अध्याय V मध्ये व्यक्तींच्या अटकेचे अधिकार आणि अटक केलेल्या व्यक्तीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी पोलिसांनी पाळावे लागणारे संरक्षण याचा उल्लेख आहे. घटनेच्या अनुच्छेद २०(३) आणि २२ मध्ये, प्रत्येक नागरिकाला दिलेले घटनात्मक संरक्षण आणि केवळ प्राणी म्हणून अस्तित्व न ठेवता जीवन अर्थपूर्ण बनविण्याची हमी दर्शविते. त्यामुळे घटनेतील अधिकारांचा अवमान करण्यासाठी छळ आणि कोठडीतील हिंसाचाराला परवानगी कशी देता येईल हे समजणे कठीण आहे. अमानवीय छळ, हल्ला आणि कोठडीत मृत्यू याने भयावह प्रमाण धारण केल्याचे दिसते ज्यामुळे कायद्याचे राज्य आणि फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनाच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. यथोचितपणे समाजात अशांतता निर्माण होते. न्यायासाठी हाक अधिक तीव्र होते आणि त्वरित उपाययोजनांची गरज भासते. या न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये

कायद्यांच्या रक्षकांकडून होणाऱ्या अत्याचारांवर चिंता व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती ब्रँडीसची निरीक्षणे, जी उत्कृष्ट मानली गेलेली आहे, त्यातील अजरामर शब्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

सर्वशक्तिमान आणि सर्वव्यापी शिक्षक म्हणून सरकार आपल्या उदाहरणाने सर्व लोकांना शिकवते. आल्मस्टेड -विरुद्ध - संयुक्त राज्य [१] च्या प्रकरणात आणि मॅप-विरुद्ध - ओहलो [२] मध्ये - 'जर सरकार कायद्याचे उल्लंघन करणारे असेल, तर ते कायद्याचा अवमान करण्यास प्रवृत्त करते; प्रत्येक माणसाला कायदा स्वतः च्या हाती घेण्यास आमंत्रित करते' असे उद्धृत केले आहे .

५. पोलिसांच्या छळाची राक्षसी पुनरावृत्ती, ज्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात भीती निर्माण होते की त्यांचे जीवन आणि स्वातंत्र्य, नवीन आणि अवांछित संकटात आहे कारण कायद्याचे पालक कोठडीत हिंसाचार आणि छळ करून मानवाधिकारांचा नाश करतात आणि त्याचा परिणाम मृत्यू ठरतो. मानवाधिकारांच्या दुबळेपणा क्लेशकारक छळ करण्यात मानला जातो, जेव्हा राज्याचे पदाधिकारी, ज्यांचे परम कर्तव्य नागरिकांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या विरुद्ध कारस्थान करणे नसते, तरी प्रत्यक्षात ते तसे करतात. दोन दशकांहून अधिक काळापूर्वी रघुवीर सिंगच्या बाबतीत जी चिंता व्यक्त करण्यात आली होती, त्याची उपेक्षा केल्याचे दिसते आणि परिस्थितीत काही लक्षणीय बदल होताना दिसत नाही. गौरी शंकर शर्मा -विरुद्ध- उत्तर प्रदेश राज्य, [७३] ; भगवान सिंग -विरुद्ध - पंजाब राज्य, [८४]; नीलाबती बेहेरा - विरुद्ध- ओडिशा राज्य,; प्रफुल्ल कुमार सिन्हा - विरुद्ध- बिहार

राज्य, [६]; केवल पती - विरुद्ध- उत्तर प्रदेश राज्य,; इंदर सिंग विरुद्ध पंजाब राज्य,; मध्य प्रदेश राज्य - विरुद्ध- श्यामसुंदर त्रिवेदी, [१] मध्ये व्यक्त केलेली व्यथा आणि आताच्या बाबतीत डी. के. बसू - विरुद्ध- पश्चिम बंगाल राज्य,; या खटल्यात प्रसिद्ध झालेल्या निर्णयामुळे कोठडीत असलेल्या व्यक्तींशी व्यवहार करताना अमानवी दृष्टीकोनाबाबत कुठलीही शिथिलता दिसून आली नाही.

६. क्वचितच, पोलिसांच्या छळाच्या किंवा कोठडीतील मृत्यूच्या घटनांमध्ये केवळ पोलिस कर्मचाऱ्यांच्या सहभागाचा प्रत्यक्ष पुरावा असतो जो त्यांच्या कोठडीतील व्यक्तीचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत झाला याचे स्पष्टीकरण देऊ शकतो. बंधुभावाच्या नात्याने बांधलेले असल्याने पोलीस कर्मचारी आपल्या सहकाऱ्यांना वाचवण्यासाठी शांत राहणे पसंत करतात आणि अनेकदा सत्याचा विपर्यासही करत असतात हे माहीतच आहे - आणि प्रस्तुत प्रकरणात एकामागून एक पोलीस साक्षीदारांनी या संपूर्ण प्रकरणाबाबत जाणीवपूर्वक अनभिज्ञता कशी दाखवली, ह्याचे एक उपयुक्त उदाहरण आहे .

७. अभियोगपक्ष प्रत्येक वाजवी शंकेपलीकडे पुरावा सिद्ध करण्यासाठी अतिशयोक्ती करतो आणि आग्रह धरतो, कधीकधी अभियोग पक्षाचा प्रतिनिधी स्वतः कटकारस्थानात अडकून पडतो, प्रस्तुत खटल्यातील वास्तविक कारण, वस्तुस्थिती आणि विशिष्ट परिस्थितींकडे दुर्लक्ष करतो, याचे परिणामी, सध्याच्या प्रकरणाप्रमाणे, न्याय चित होतो आणि न्याय वितरण प्रणालीला संशयास्पद आणि दुबळी बनवतो. शेवटी समाजाचे नुकसान होते आणि गुन्हेगारांना प्रोत्साहन मिळते.

अशा प्रकारच्या अवास्तव पद्धतीमुळे सध्या वाढत चाललेला पोलीस कोठडीतील छळाला, कधी कधी न्यायालयाद्वारे सुद्धा प्रोत्साहन मिळते, कारण यामुळे पोलिसांच्या मनात हा विश्वास दृढ होतो की जर एखाद्या कैद्याचा कोठडीत मृत्यू झाला तरी त्यांना काहीही इजा होणार नाही कारण त्यांना या छळामध्ये थेट गुंतवण्यासाठी अभियोगपक्षाकडे क्वचितच कोणता पुरावा उपलब्ध असेल. पोलीस कोठडीत मृत्यू हा कायद्याच्या नियमाने शासित सुसंस्कृत समाजातील सर्वांत वाईट प्रकारचा गुन्हा आहे आणि सुव्यवस्थित व सुसंस्कृत समाजासाठी तो गंभीर धोका आहे , न्यायालयांनी हे विसरता कामा नये. कोठडीत छळ करणे हे भारतीय राज्यघटनेने मान्य केलेल्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन तसेच मानवी प्रतिष्ठेचा अपमान आहे. पोलिसांच्या अतिरेकी कारवाई आणि स्थानबद्ध केलेले / न्यायचौकशी सुरु असलेले कैदी किंवा संशयितांशी वाईट वागणूक यामुळे कोणत्याही सुसंस्कृत देशाची प्रतिमा मलिन होते आणि खाकीतील पुरुषांना स्वतःला कायद्यापेक्षा वरचढ समजून काही वेळा स्वतः लाच कायदा समजून घ्यायला प्रोत्साहन मिळते. जोपर्यंत पिके खाणाऱ्या कुंपणाच्या आजाराला आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या जात नाहीत तोपर्यंत फौजदारी न्याय वितरण प्रणालीचा पाया डळमळीत राहिल, अराजकता आणि हुकूमशाहीच्या दिशेने केलेली वाटचाल रानटीपणाची आठवण करून देईल आणि परिणामी सभ्यतेचा संपूर्ण क्षय होण्याच्या धोका राहिल, म्हणूनच न्यायालयांनी अशा प्रकरणांचा वास्तविकतेने आणि संवेदनशीलतेने विचार केला पाहिजे, अन्यथा न्यायव्यवस्थेच्या

कार्यक्षमतेवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास हळूहळू कमी होईल, आणि असे झाल्यास तो दिवस दुःखद दिवस म्हणून गणल्या जाईल.

८. भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३३० आणि ३३१ अंतर्गत (थोडक्यात, भा. द. वि.) कबुलीजबाब मिळविण्याच्या उद्देशाने दुखापत करणाऱ्या व्यक्तींना १० वर्षांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे, परंतु अनुभवातून असे दिसून आले आहे की अशा हल्ल्यांच्या लक्षणीय वाढीच्या तुलनेत अपराधसिद्धीचा प्रमाण फारच कमी आहे, कारण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अत्याचाराची जास्त माहिती न काढता, अनेकदा गुन्हेगार कोण आहेत हे सिद्ध करण्यासाठी फारसा प्रत्यक्ष किंवा थेट पुरावा नसल्यामुळे सोडून दिला जातो. या परिस्थितीमुळे अस्वस्थ झालेल्या विधी आयोगाने आपल्या ११३ व्या अहवालात भारतीय पुरावा कायदा, १८७२ (थोडक्यात पुरावा कायदा) मध्ये दुरुस्ती करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून पोलीस कोठडीत असताना एखाद्या व्यक्तीला शारीरिक जखमा केल्याच्या कथित गुन्ह्यासाठी एखाद्या पोलीस अधिकाऱ्यावर अभियोग चालवताना, ती व्यक्ती पोलीस कोठडीत असताना जखमा झाल्याचा पुरावा असल्यास, जोपर्यंत पोलिस अधिकारी उलट सिद्ध करत नाही तोपर्यंत त्या कालावधीत संबंधित पोलीस अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला दुखापत केल्याचे न्यायालय गृहीत धरू शकते. उलट सिद्ध करण्याची जबाबदारी संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर सोपविली पाहिजे. गुन्ह्याचा अमानवीय पैलू लक्षात घेता, गुन्ह्यात बळी पडलेल्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आणि अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये होणारी वाढ, जिथे काही

मोजकेच गुन्हे समोर येतात आणि इतर नाही, सरकार आणि विधिमंडळाने विधी आयोगाच्या शिफारशींवर गांभीर्याने विचार केला पाहिजे आणि पोलीस कोठडीतील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठीच नव्हे तर पोलीस कोठडीतील गुन्ह्यात शिक्षा झालीच पाहिजे यासाठी कायद्यात योग्य बदल केले पाहिजेत. न्यायालयाने देखील कोठडीतील गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये त्यांचा दृष्टिकोन, हाताळण्याची पद्धत, आकलन आणि वृत्ती याच्यात बदल करणे आवश्यक आहे आणि कोठडीतील गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणे हाताळताना त्यांनी अधिक संवेदनशीलता दाखवली पाहिजे आणि संकुचित तांत्रिक दृष्टिकोनाऐवजी वास्तविक दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे जेणेकरून त्यांच्या अधिकारांमध्ये शक्य तितके सत्य सापडू शकेल आणि गुन्हेगार पळून जाऊ शकणार नाहीत ज्यामुळे गुन्ह्यातील पीडितेला समाधान मिळेल आणि शेवटी कायद्याचे वैभव टिकून राहील."

३०. या प्रकरणात किती नुकसान भरपाई दिली जावी हा एकमेव प्रश्न आता आमच्यासमोर आहे. या संदर्भात याचिकाकर्त्याने प्रस्तुत याचिकेत १० लाख रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी केली आहे. तिने यापूर्वी दाखल केलेल्या याचिकेत सुद्धा १० लाख रुपयांची नुकसान भरपाई मागितली होती. सध्याच्या याचिकेत दुरुस्ती करून, तिने १३,५०,००० रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी केली आहे. याचिकाकर्तीला अंतरिम नुकसान भरपाई म्हणून २ लाख रुपये मिळाल्यामुळे तिने आपला दावा ११, ५०, ०००/- रुपयांपर्यंत मर्यादित ठेवला आहे.

३१. दुसरीकडे, प्रतिवादी-राज्याने या प्रकरणाची तपासणी केली आहे आणि त्यांच्या मते, आणखी भरपाई देणे न्याय्य व योग्य होणार नाही या आशयाचे निवेदन घेऊन अतिरिक्त नुकसान भरपाईची रक्कम रुपये एक लाख दिली जाऊ शकते . प्रतिवादी राज्याने पुढे निवेदन केले आहे की, यामुळे राज्य तिजोरीवर अकाली भार पडेल आणि एक आदर्श देखील स्थापित होईल आणि विशेषतः या प्रकरणात मृत व्यक्तीकडून काही चोरीची मालमत्ता वसूल केली गेली आणि खटला प्रलंबित आहे, म्हणून ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई न्याय्य आणि वाजवी आहे.

३२. आमच्या मते, या प्रकरणात मृत व्यक्तीकडून चोरीची काही मालमत्ता जप्त करण्यात आली होती आणि खटला प्रलंबित आहे, अशी प्रतिवादी-राज्याची भूमिका म्हणजे मृत व्यक्तीची विधवा आणि मुलांना नुकसानभरपाई नाकारण्याचे हे एक कारण असू शकत नाही कारण प्रथमतः प्रतिवादी- राज्याचे प्रकरण असे नाही की मृतकास सदर खटल्यामध्ये 'आरोपी' म्हणून अटक केले गेले होते आणि दुसरे कारण म्हणजे याचिकाकर्तीने असा दावा केला की तिच्या पतीला तीन दिवस चुकीच्या पद्धतीने स्थानबद्ध करण्यात आले होते आणि त्याला जबरदस्तीने १३० ग्रॅम वजनाचे सोने, १०० ग्रॅम वजनाचे चांदी आणि १५,००० रुपयांची लाच देऊन मुक्त होऊ देण्यासाठी पोलीस कोठडीत त्याचा छळ करण्यात आला. सदर प्रकरणात कोणतेही शपथपत्र दाखल करून याला आव्हान दिले गेलेले नाही.

३३. चुकीच्या पद्धतीने स्थानबद्ध ठेवणे आणि कोठडीत अत्याचार आणि कोठडीत मृत्यू या प्रकरणांचा विचार कसा केला जावा याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या वरील तीन महत्त्वपूर्ण निर्णयांचा आम्ही आधीच उल्लेख केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की हे केवळ भारतीय घटनेच्या अनुच्छेद २१ आणि २२ अंतर्गत हमी दिलेल्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन नाही, तर नागरिकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन देखील आहे. त्यामुळे राज्य सरकारने दंगली, अपघात आणि नैसर्गिक आपत्तीच्या पीडितांना भरपाई दिल्याच्या प्रकरणांचा विचार आणि तुलना, सदर प्रकरणाच्या बाबतीत केली जाऊ शकत नाही. सदर प्रकरणात, भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे आणि मानवाधिकारांचे उल्लंघन करून राज्यातील अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून हे कृत्य केले आहे.

३४. म्हणून, याचिकाकर्तीला प्रतिवादी-राज्याने आधीच दोन लाख रुपये दिले आहेत, ज्याला या न्यायालयाने अंतरिम भरपाई म्हणून मानले होते, याचा विचार केल्यावर आम्हाला आढळते की मृत सुधाकर येरपुडे यांच्या मूलभूत तसेच मानवाधिकारांचे पहिले उल्लंघन म्हणजे, लकडगंज पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी त्याला तीन दिवस पोलिस कोठडीत चुकीच्या पद्धतीने ठेवणे आणि सोने, चांदी आणि १५,०००/- रुपयांची लाच म्हणून खंडणी घेणे, या कृत्याबद्दल ३ लाख रुपयांची रक्कम न्याय्य आणि वाजवी असेल आणि ती न्यायाची पूर्तता करेल.

३५. दुसरी घटना म्हणजे त्याला चुकीच्या पद्धतीने स्थानबद्ध करणे आणि कोठडीत त्याचा छळ करणे, ज्यामुळे त्याला मरण येणे, त्याच्या मोबदल्यात २ लाख रुपयांची रक्कम जी यापूर्वीच याचिकाकर्तीला देण्यात आली आहे ती लक्षात घेतल्यानंतर, ५ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम न्याय्य आणि वाजवी असेल.

३६. मृतक सुधाकर याची कोठडीत मृत्यू झाल्यामुळे याचिकाकर्ती आणि तिच्या मुलांना झालेल्या नुकसानाबरोबरच वेदना, मानसिक छळ, एकाकीपणा, मुलांचे कल्याण, सोबती गमविणे आणि देखभालीचे नुकसान याचा विचार करून आम्ही सदर निष्कर्षाप्रत पोहोचलो आहोत.

३७. याचिकाकर्तीला वरील प्रमाणे देण्यात आलेली भरपाई न्याय्य आणि योग्य असेल कारण मृतक व्यक्ती केवळ ४० वर्षाची होती.

३८. न्यायालयांनी वेळोवेळी पोलिसांच्या अशा वर्तनाबद्दल नापसंती दर्शवली आहे, जे या न्यायालयाने वरील तीन निर्णयांमध्ये आधीच नमूद केले आहे आणि नुकसान भरपाई देण्याचाही राज्यावर प्रतिबंधात्मक परिणाम झाला पाहिजे, जेणेकरून त्याच्या अधिकाऱ्यांना मानवी जीवन हिरावून घेण्यापर्यंतच्या बेकायदेशीर कृत्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाऊ नये, ज्याची राज्यघटनेत मूलभूत हक्क म्हणून हमी देण्यात आली आहे.

३९. सुधाकर यांची तीन मुले ही अल्पवयीन आहेत, हे लक्षात घेऊन आम्ही प्रतिवादी - सरकारला हा न्यायनिर्णय जाहीर झाल्यापासून चार आठवड्यांच्या आत आठ लाख रुपयांची नुकसान भरपाई न्यायालयात जमा करण्याचे निर्देश देत आहोत. ही रक्कम सुरुवातीला पाच वर्षांसाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवींमध्ये गुंतवली जाईल आणि त्यानंतर वेळोवेळी त्याचे नूतनीकरण केले जाईल. याचिकाकर्तीला दैनंदिन खर्चासाठी या रकमेवरील त्रैमासिक व्याजाची रक्कम काढण्याचा अधिकार असेल. तत्पश्चात सदर रक्कम याचिकाकर्ती आणि तिच्या मुलांना समान वाटून दिली जाईल, मुले सज्ञान झाल्यावर त्यांना ही रक्कम काढता येईल.

४०. याचिकाकर्तीला या प्रकरणात कोणताही आदेश मागण्याचे स्वातंत्र्य आहे आणि न्यायालय याचिकाकर्ती आणि तिच्या मुलांना कोणत्याही आकस्मिक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी रक्कम काढण्याची परवानगी देऊ शकते.

४१. मृतक सुधाकर येरपुडेला चुकीच्या पद्धतीने बंदिवासात ठेवून आणि पोलीस कोठडीत त्याचा छळ केल्याबद्दल दोषी आढळलेल्या लकडगंज पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि त्याला स्थानबद्ध करून आणि पोलीस कोठडीत त्याचा छळ केल्याने तो मरण पावला बद्दल, दोषी आढळलेल्या गिट्टीखदान पोलीस ठाण्याचे अधिकारी यांचेकडून याचिकाकर्ती आणि तिच्या मुलांना दिलेली नुकसानभरपाईची रक्कम प्रतिवादी - राज्य वसूल करू शकते.

४२. आम्ही या याचिकेचा खर्च देखील मंजूर करतो, जो आम्ही चार आठवड्यांच्या आत या न्यायालयात जमा करण्यासाठी दहा हजार रुपये निर्धारित करतो.

४३. याचिकाकर्तीला, या न्यायालयाच्या निर्देशानुसार, नुकसान भरपाईसह जमा केलेल्या खर्चाची रक्कम काढण्याची परवानगी आहे. त्या अनुषंगाने सापेक्ष विधिनिर्णय मंजूर केला जातो.

४४. प्रमाणित प्रत जलद गतीने तयार करण्यात आली.

-----

१. १९९७ क्रि. एल. जे. ७४३ : (१९९७) १ एस. सी. सी. ४१६ :
ए. आई. आर. १९९७ एस. सी. ६१०.

१. १९९३ क्रि. एल. जे. २८९९ : (१९९३) २ एस. सी. सी. ७४६ :
ए. आई. आर. १९९३ एस. सी. १९६०

१. १९९७ क्रि. एल. जे. ७४३ : (१९९७) १ एस. सी. सी. ४१६ :
ए. आई. आर. १९९७ एस. सी. ६१०

१. २००३ क्रि. एल. जे. ४५४८ : (२००३) ७ एस. सी. सी. ७४९ :
ए. आई. आर. २००३ एस. सी. ४५६७ : २००४ (१) बॉं. सी. आर. (क्रि. ) १३.

२. १९८० क्रि. एल. जे. ८०१ : (१९८०) ३ एस. सी. सी. ७० :
ए. आई. आर. १९८० एस. सी. १०८७

१. १९२८ (२७७) यू. एस. ४३८

२. १९६१ (३६७) यू. एस. ६४३

३. १९९० पुर. एस. सी. सी. ६५६ : ए. आई. आर. १९९० एस. सी. ७०९ : १९९० (१) एस. सी. आर. २९ : १९९० क्रि. एल. जे. १६६

४. १९९२ क्रि. एल. जे. ३१४४: ए. आई. आर. १९९२ एस. सी. १६८९: १९९२ (३) एस. सी. आर. १८०: (१९९२) ३ एस. सी. सी. २४९

५. १९९३ क्रि.एल. जे. २८९९ : (१९९३) २ एस. सी. सी. ७४६ : ए. आई. आर. १९९३ एस. सी. १९६०

६. १९९४ पुर. (३) एस. सी. सी. १००

७. १९९५ क्रि.एल. जे. २९२० : (१९९५) ३ एस. सी. सी. ६००: १९९५ (२) एस.सी. जे. ५४०

८. १९९५ क्रि.एल. जे. ३२३५ : ए. आई. आर. १९९५ एस.सी. १९४९ : (१९९५) ३ एस. सी. सी. ७०२

९. १९९५ ए. आई. आर. एस. सी. डब्ल्यू. २७९३ : (१९९५) ४ एस.सी. सी. २६२: १९९५ (२) एस. सी.जे. ४५१

१०. १९९७ क्रि.एल. जे. ७४३ : (१९९७) १ एस.सी. सी. ४१६ : ए. आई. आर. १९९७ एस. सी. ६१०.

-----

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही  तसेच इंग्रज़ी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-----